Historicity Research Journal
Volume 1 | Issue 4 | Dec 2014 ISSN:- 2393-8900

**Research Article**

# *राहुल सांकृत्यायन यांचे बौध्द धर्म विषयक चिंतनः एक विश्लेषण*

***प्रविण एकनाथ बोरकर***

सहाय्यक प्राध्यापक , इतिहास विभाग, आर. के. तलरेजा महाविद्यालय, उल्हासनगर, जि. ठाणे.

***सारांश–***

राहुल सांकृत्यायन हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांच्या संपूर्ण जीवनावर दृष्टिक्षेप टाकल्यास तसेच त्यांच्या लिखाणावर नजर फिरविल्यास त्यांच्या जीवनात बुध्दविचारांचे असलेले महत्व स्पष्ट होते. केदारनाथ पांडेला राहुल सांकृत्यायन बनविण्यात बौध्द धर्म कारणीभूत होता. बौध्द् धर्माची दीक्षा घेतल्यानंतर त्यांनी राहुल सांकृत्यायन हे नाव धारण केले. राहुलजीचे सर्वाधिक लिखाण बुध्द, बौध्द साहित्यावरच आहे. त्यांच्या ऐतिहासिक कथा व कादंबऱ्यांचे नायकही बौध्द पात्र आहेत. बौध्द धर्माच्या लुप्त झालेल्या साहित्याच्या निर्मितीत व ग्रंथाच्या शोधात त्यांचे योगदान महत्वाचे आहे. तिबेटच्या आपल्या चार यात्रांमधून त्यांनी मौल्यवान अशी बौध्द साम्रगी भारतात परत आणली. त्यांनी श्रीलंकेत जाऊन पालीचे अध्ययन केले त्यामुळे त्यांना बुध्दधर्माचा सखोल अभ्यास करता आला. बौध्द धर्माग्रंथांच्या अभ्यासातून त्यांचे बुध्दविचार व बौध्द तत्वज्ञानविषयीचे विचार आकारास आले असून करता आला. बौध्द धर्मग्रंथांच्या अभ्यासातून त्यांचे बुध्दविचार विचार आकारास आले असून त्यांच्या विविध ग्रंथात ते व्यक्त होतांना दिसतात. राहूलजी बुध्दाला अग्रणी समजतात. राहूलजींना बौध्द तत्वज्ञान अडीच हजार वर्षाच्या काळापेक्षा आजच्या आधुनिक युगाशी अनुरूप वाटते.

Key Words– बुध्द, बौध्द धर्म, राहुल सांकृत्यायन बौध्द तत्वज्ञान, त्रिपिटक, त्रिपिटकाचार्य, मार्क्सवाद, ईश्वर , वर्णव्यवस्था.

***प्रस्तावना–***

राहुल सांकृत्यायन यांचा मुळ पिंड लेखकांचा व प्रवाशाचा होता. कधी साधू, कधी प्रवासी, कधी बौध्द भिचक्खु तर कधी मार्क्सवादी अशा विविध प्रकारे त्यांनी आपले आयुष्य व्यतीत केले. त्यांचे वैचारित मत क्रमशः बदलत गेले असले तरी त्यांच्या जीवनावर बौध्द धर्माच विशेष प्रभाव असल्याचे दिसून येते. बौध्द धार्मिक स्थळांच्या यात्रा, बौध्द धर्माची दीक्षा इत्यादी ठळक घटना त्यांच्या बौध्द जीवनप्रवासातील अत्यंत महत्वाच्या घटना आहेत. राहुलजी गौतम बुध्दाला सर्वोत्तम भूमिपूत्र मानतात. तत्वज्ञानाच्या क्षेत्रातही राहुलजी बुध्दाला अग्रणी मानतात. बुध्दाच्या तत्वज्ञानाला जगातील सर्वात विकसित तत्वज्ञान मानतात. बुध्दाने ईश्वर , वर्णव्यवस्था व वेद नाकारले तरीसुध्दा त्यांना अवतातर ठरविण्यात आल्याने ते आपली नाराजी व्यक्त करतात. बौध्द धर्माचा अनात्मवाद त्यांना महत्वांचा वाटतो. बौध्द धर्माचा मार्ग शांतीचा मार्ग होता. शांतीपूर्ण पध्दतीने बौध्द धर्माचा प्रसार करण्यात आल्याचे राहुलजी सांगतात. बुध्दाच्या विचारांचा प्रभाव जगावर आहे पण त्यातही आशिया खंडावर बुध्दांच्या विचारांचा विशेष प्रभाव असल्याचे राहुलजी सांगतात. भारतीय संस्कृतीला सहिष्णू बनविण्यात बौध्द धर्माची भूमिका महत्वाची आहे असे राहुलजी सांगतात. भारताच्या प्रती जगातील लोकांची आदराची भावना बुध्दामुळेच आहे असे राहुलजी विशद करतात. बुध्दविचारांना मार्क्सवादी दृष्टिकोनातून बघण्यात राहुलजी अग्रणी आहेत. ते मार्क्सवादी दृष्टिकोनातून बुध्दविचारांचे विश्लेषण करतात.

## *केदारनाथ पांडे ते राहुल सांकृत्यायन–*

राहुल सांकृत्यायन यांचा जन्म एका ब्राम्हण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव केदारनाथ पांडे होते. त्यांचे वडील केदारनाथ पांडे धार्मिक वृत्तीचे होते. एकोणिसाव्या वर्षी जेव्हा संस्कृतचे प्रकांड विद्वान रामावतार शर्मा यांचे भाषण त्यांनी ऐकले तेव्हा त्यांच्यात प्रथम बुध्दिवादी शोधाबद्दल इच्छा जागृत झाली. 1912 मध्ये राहुलजी परसा मठातील महंत लछमनदास यांच्या

संपर्कात आले आणि 'वैष्णव' बनले. ते आता केदारनाथ न राहता 'रामउदारदास' बनले. मठातील देवांची यांत्रिक पूजा अर्चा आणि विधी – तंत्र–मत्रांच्या दैनिक कार्याला आणि आरामशीर जीवनाला ते कंटाळले. राहुलजीच्या मते ''मेरे लिए परसा का निवास बौध्दिक अनशन था।'' राहुलजींना या वातावरणातून मुक्तता हवी होती. 1914 मध्ये राहुलजी आर्य समाजाच्या सपंर्कात आले आणि 1915 मध्ये राहुलजी 'आर्यसमाजी' बनले. परसा मठापेक्षा इथे त्यांना मुक्त वातावरणाचा अनुभव आला ते लिहतात. ''वहॉ मेरे विचार वंध्या समान थे, किन्तु यहॉ आर्य–समाज में अपनी बुध्दि को ज्यादा स्वच्छन्द,ज्यादा अनुकुल परिस्थितियों में पा रहा था।'' त्यावेळी राहुलजी आर्य समाजालाच सार्वभौम धर्म समजत असत. परंतु हळुहळु आर्यसमाजात सुध्दा राहूलजींना बंदिस्तपणा वाटू लागला व ते बौध्द धर्माकडे आकर्षित झाले.

इ.स.1916 मध्ये राहुल सांकृत्यायन यांची भिक्खू बोधानंद यांच्याशी झालेली भेट, 1920 मध्ये राहूलजींनी केलेली बौध्द धर्मस्थळांची यात्रा व लडाखची यात्रा यामुळे बौध्द धर्माचा विशेष अभ्यास करण्याची जिज्ञासा त्यांच्यात निर्माण झाली. 1927 मध्ये ते श्रीलंकेला गेले. वातारणाने , पाली भाषा व त्रिपिटकाच्या अध्ययनाने ते बौध्द धर्माच्या अधिक जवळ आलेत. परंतु राहूलजी अजूनही ईश्वरवादी होते. प्रारंभी त्यांनी ईश्वर व बुध्द दोधांचा एकत्रित विचार केला; परंतु ते जमले नाही. राहूलजी लिहितात, ''ईश्वर और बुध्द साथ नही रह सकते, यह साफ हो गया , और यह भी स्पष्ट मालूम होने लगा कि, ईश्वर सिर्फ काल्पनिक चीज है , बुध्द यथार्थवक्ता है।'' राहूलजींचा आता ईश्वरावर विश्वास राहीला नव्हता. 1928 मध्ये श्रीलंकेतील विद्यालंकार त्यांला 'त्रिपिटकाचार्य' ही पदवी प्रदान केली. त्यानंतर 1930 मध्ये राहुलने बौध्द धर्माची दीक्षा घेतली व ते आता 'रामउदार' न राहता 'राहुल सांकृत्यायन' बनले. पुढे शेवटपर्यंत त्यांनी 'राहुल सांकृत्यायन' हेच नाव धारण केले.

### *गौतम बुध्दाविशयीचे विचार–*

राहुलजी गौतम बुध्दाला सर्वोत्तम भूमिपूत्र मानतात. त्यांच्या मते, ''बुध्द का व्यक्तित्व समन्तभद्र, सर्वतोभद्र है। इतिहास मे ऐसा व्यक्ति मिलना दुर्लभ है, जो प्रतिभा में मधुर बर्ताव में , दीन–हिनों की प्रति, कार्यरूप मे सम्वेदना दिखलाने मे इतना उॅचा हो जितने कि भारत के सर्वश्रेष्ठ पुत्र और मानवता के सर्वोत्तम पथ– तीन हजार वर्षाच्या ऐतिहासिक काळातील सर्वश्रेष्ठ पुरूष मानले आहे ते लिहतात, ''पिछले ढाई– तीन हजार वर्षो के ऐतिहासिक युगमें बुध्द सर्वश्रेष्ठ पुरूष है, यह दुनिया के सभी विद्वान , मनीषियों और तत्वचिंतको की राय है।'' राहुलजी संस्कृत तत्वज्ञज्ञानांच्या विद्वानांनी बुध्दाा अनुल्लेख केल्याबद्दल नाराजी व्यक्त करतात तर बुध्दाच्या उल्लेखाकरिता इंग्रज लेखकांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतात. त्यांच्या मते, ''बुध्द भारत से खो गये थे। उनका संदेश सबसे पहजे अंगरेज लेखको द्वारा ही मिला– यद्यपिइ स क्षेत्र मे काम करनेवाले अंगरेजो से भी पहले तथा अधिक व्यापक रूप में रूसी थे, जिनके बाद जर्मन और फ्रेंच विद्वान भी अंगरेजो से पीछे नही थे।''

राहुलजींच्या मते भारतात अनेक महापुरूष जन्माला आलेत परंतु त्यात बुध्द वेगळे आहेत, ते लिहितात, ''हमारे देश को भी बडे–बडे पुरूषो को पैदा करने का सौभागय प्राप्त हुआ है, पर बुध्द को जैसा पूर्ण देखा जाता है, वैसे नही मिलेंगे।'' बुध्दाने जातीप्रथा, विषमता याविरूध्द आवाज उठविला व समजेचा प्रचार केला. राहुलजी लिहितात, ''समाज में आर्थिक असमानता दूर नहीं हुई मगर गरीबों मे बौध्द धर्म के प्रति श्रध्दा पैदा हुई।'' इथे राहुलजींचा मार्क्सवादी दृष्टीकोन व्यक्त होतांना दिसतो. बुध्दाने ईश्वर, वर्णव्यवस्था , वेद नाकारले, तरीसुध्दा त्यांना ईश्वर मानून अवतार माना और आज के युग को बौध्दावतार का युग कह कर प्रसिध्द किया।''यातून राहुलजींचा नाराजी व्यक्त होते.

### *बौध्द धर्माविशयी विचार–*

राहुलजी बौध्द धर्मापासून प्रभावीत होते. बौध्द धर्माने शांतीपूर्ण पध्दातीने आपल्या विचारांचा प्रचार–प्रसार केला. बौध्द धर्माचा मार्ग शांतीचा मार्ग होता. राहूलजी लिहितात, '' बौध्द धर्म ने अपने विचारों के प्रसार के लिए जिस रास्ते का अनुसरण किया, वह था समझाकर विचारों मे परिवर्तन लाना।'' बुध्द अनुयांयानी धम्मप्रचारात कोणावरही जोर– जबरदस्ती केली नाही. बुध्दाचा धर्म की एक सबसे बडी देन वह है; जिसके कारण एशिया के सबसे अधिक भाग में मैत्री और आत्मीयता स्थापित हुई है।''

युरोपीय लोकांचर सुध्दा बुध्दाच्या विचारांचा प्रभाव निर्माण झाला हे सांगताना राहुल लिहितात, ''युरोप के अभिमानी लोगों ने भारत के प्रति सम्मान का भाव पहले पहल बौध्द कृतियों से सीखा था। बुध्द के जीवन और शिक्षा ने अरनॉड को 'एशिया का प्रकाश' (Light of Asia) जैसी अमर कविता लिखने की प्रेरणा दी।'' भारतीय संस्कृतीला सहिष्णू बनविण्यात बौध्द धर्माची भूमिका सर्वात महत्वाची आहे हे सांगताना राहुलजी लिहितात, ''विचारों की जो सहिष्णुता भारतीय संस्कृति का अंग बन गई है , वह एक दिन का काम नहीं था। शताब्दियो में हम इस योग बन सके । जिन लोगों ने इस दिशा में प्रयत्न किया , उनमें बौध्द सबसे अधिक और आगे रहे।'' बुध्दाचे विचार वैज्ञानिक होते व प्रगतीशील होते असे राहुलजींना वाटते ते लिहितात, ''आजकल के वैज्ञानिक और प्रगतीशील विचारधाराओं से मुकाबला किया जाये तो बुध्द और विचारक उसेसे बहुत नजदीक मालूम होते है।''

***बौध्द तत्वज्ञानविशयी विचार–***

बुध्दाचे तत्वज्ञान हे जगातील सर्वात विकसित तत्वाज्ञान आहे हे सांगताना राहुलजी लिहितात, '' आहिंसा के महान प्रचारक के तौर पर बुध्द को लोग जानते है। वह बडे योगी थे, यह भी पता है। शकाराचार्य ने तो उन्हें 'योगिनां चक्रवती' कहा है। दर्शन में वह उस दर्शक के प्रवर्तक थे, जो आज अपने विकसित रूप में संसार का सबसे बडा दर्शन है।'' बुध्दाने ईश्वर व दिव्य शक्तीचे अस्तित्व नाकारले व त्यांच्याकडून जगाच्या कल्याणाची अपेक्षाही केली नाही. याउलट त्यांनी कर्माला व बहुजन हिताला प्राधान्य दिले, राहुलजी या संदर्भात लिहितात,'' उन्होंने बहुजन हित – सुख को ही सर्वोपरि माना, उसी के लिये अपने जीवन को प्रदान किया, और अपने अनुयायियो के लिए को भी बहुजन हिताय बहुजन सुखाय संसार में विचरणे के लिए कहा।'' राहुलजी तत्वज्ञानाच्या क्षेत्रात बुध्दाला अग्रणी समजातात, त्यांच्या मते, ''में तो कहूँगा बुध्द की जितनी जर्बदस्त देन दर्शन में है, उनती और किसी क्षेत्र में नही है– अर्थात वह सबसे पहले दार्शनिक है, उसले बाद और कुछ।'' राहुलजीना बौध्द तत्वज्ञान आजच्या आधुनिक युगाशी अधिक अनुरूप वाटते. त्यांच्या मतानुसार, ''जब हम बुध्द को दर्शन को लेते है, तो उसमें ऐसे गम्भीर तत्वोंका प्रतिपादन मिलता है, जो ढाई हजार वर्ष पहिले वाले काल की अपेक्षा आधुनिक वैज्ञानिक युग के अधिक अनुरूप मालूम होता है।'' यावरून बौध्द तत्वज्ञान हे कालसापेक्ष आहे असे राहूलजींना सांगावयाचे आहे असे दिसते.

***राहुलजींच्या बौध्दचिंतनाचे मूल्यांकन–***

राहूल सांकृत्यायन यांचे बौध्द धर्म विषयक चिंतन अंत्यत मूलगामी असे आहे. राहूलजी बौध्दाधर्माचा सर्वांग विचार करतांना दिसतात. बुध्द त्यांचा धम्म व तत्वज्ञान याविषयी त्यांची मते स्पष्ट आहे. ते बौध्द धर्माचे प्रशंसक व प्रचारक आहेत. बौध्द धर्माचा विज्ञानाशी व मार्क्सवादाशीते जोडू पाहतात. बुध्दाचे विचार त्यांचा धर्म व तत्वज्ञान कालसापेक्ष आहे असे त्यांना वाटते. त्यांचा सहकारी मित्र प्रभाकर माचवे यांच्या शब्दात ,''राहूल सांकृत्यायन भारतीय आणि भारतीय बौध्द तत्वज्ञानाची नवी व्याख्या करणाऱ्यांमध्येच अग्रणी, श्रेष्ठ नव्हेत तर पुरोगामी विचारधारा देणारे भारतीय प्रमुख प्रचारक होते.'' एकूणच काय तर राहूलजींचे बौध्द धर्माविषयक चिंतन अंत्यत महत्वाचे आहे.

***संदर्भ***

1. सांकृत्यायन राहूल, मेरी जीनवयात्रा ,खंड –1, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली दु.आ.2010, पृष्ठ क्र.135
2. तत्रैव, पृष्ठ क्र.187
3. सांकृत्यायन राहूल, मेरी जीनवयात्रा ,खंड –2, राधाकृष्ण प्रकाशन, नई दिल्ली दु.आ.2010, पृष्ठ क्र.19
4. सांकृत्यायनराहुल, अतीतसेवर्तमान, विद्यामन्दिरप्रेसलि. वारासणी, 1956, प्रथमसंस्करण, 156
5. तत्रैव, पृष्ठक्र. 169
6. तत्रैव, पृष्ठक्र. 65
7. सांकृत्यायनराहुल, महामानवबुध्द, गौतमबुकसेन्टर, दिल्ली 2010, पृष्ठक्र. 21
8. तत्रैव, पृष्ठक्र. 41
9. तत्रैव, पृष्ठक्र. 56
10. तत्रैव, पृष्ठक्र. 107
11. तत्रैव, पृष्ठक्र. 81
12.. तत्रैव, पृष्ठक्र. 110
13. तत्रैव, पृष्ठक्र. 110
14. तत्रैव, पृष्ठक्र. 117
15. तत्रैव, पृष्ठक्र. 116
16. तत्रैव, पृष्ठक्र. 65
17. तत्रैव, पृष्ठक्र. 75
18. सांकृत्यायनराहुल, अतीतसेवर्तमान, विद्यामन्दिरप्रेसलि. वारासणी, 1956, प्रथमसंस्करण, पृष्ठक्र, 157
19. तत्रैव, पृष्ठक्र. 169
20. मचवेंप्रभाकर, भारतीय साहित्याचेनिर्माते, राहुलसांकृत्यायनअनुवाद, अरूणा लोखंडे, साहित्य अकादमी, नवीदिल्ली, 2009, पृष्ठक्र. 40